॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२५–२६/६६ दिनांक : २२/०७/२०२५

परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो.कार्यक्रम राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: अदिवासी महिलांनी बनवलेल्या अदिवासी कलाकृती आणि उत्पादनांना प्रोत्सहन देणे बाबत

संदर्भ: मा. एस. राममुर्ती, राज्यपाल महोदयांचे उपसचिव, राजभवन मुंबई यांचे दिनांक ८ जुलै २०२५ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयी मा. एस. राममुर्ती, राज्यपाल महोदयांचे उपसचिव, राजभवन मुंबई यांच्या संदर्भिय पत्रानुसार अनेक संस्थांनी माननीय राज्यपाल महोदयांना भेटून अदिवासी महिलांनी बांबू वापरून तयार केलेल्या अदिवासी कलाकृती जसे की बांबु राखी, बांबु ॲटर्न आणि इतर हस्तनिर्मीत उत्पादने यांच्या क्षमतेबद्दल माहिती दिली आहे. त्यानुषंगाने माननीय राज्यपाल महोदयांनी राज्य विद्यापीठे आदिवासी आणि बचत गटांच्या महिलांना त्यांच्या आर्थिक विकासासाठी आणि उपजीविकेसाठी आवश्यक प्रशिक्षण, क्षमता बांधणी, ब्रॅडिंग, मार्केटिंग साठी मदत घेण्यात यावी. व त्यानुषंगाने महाराष्ट्र बांबू विकास मंडळ (MBDB) नागपूर, संपुर्ण बांबू केंद्र, धरनी जि. अमरावती खादी आणि ग्रामोद्योग कमिशन आयोग (KVIC) मुंबई, विवेक ग्रामीण विकास केंद्र भालिवली, ता. वसई जिल्हा पालघर इत्यादी अनेक सरकारी आणि गैर–सरकारी संस्था या क्षेत्रात काम करत आहेत, वरील कामासाठी त्यांची मदत घेण्याबाबत कळविले आहे. तसेच महिला सक्षमीकरण संस्थेने (IWE) विकसित केलेल्या श्री शक्ती, यशस्विनी एटे यासारख्या महिला उद्योजकांसाठी खास बनवलेल्या पोर्टलवर अनेक महिला बचत गटांनी स्वत:ची नोंदणी केली आहे. आदिवासी विभाग आणि TRTI द्रारे विकसित केलेल्या काही इतर पोर्टलचा वापर आदिवासी गट आणि महिला बचत गटांनी बनवलेल्या उत्पादनांचा प्रचार करावा तसेच महाविद्यालय/विद्यपीठ स्तरावरील स्वंयसिध्द केंदे यासंदर्भात समन्वय साधन्याबाबत कळविले आहे.

त्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त रा.से.यो. स्वंयसेवक/स्वंयसेविका यांना अदिवासी महिलांनी बांबू वापरून बनवलेल्या अदिवासी कलाकृती आणि उत्पादनांना प्रोत्सहन देण्यासाठी प्रेरित करावे व यासंदर्भात उपरोक्त संस्थांची मदत घेण्यात यावी, ही विनंती.
(अधिक माहितीसाठी संपर्क: सेवा विवेक डॉट कॉम–८४११०७८४८४)

प्रा. डॉ. मारोती गायकवाड
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की,